दै. पुण्यनगरी (5)

# अंतिम मतदारयादी उद्या प्रसिद्ध होणार

नांदेड, दि.७: महापालिका निवडणुकीसाठी मतदारांच्या अंतिम यादीच्या प्रसिद्धीची तारीख लांबल्यामुळे पुन्हा एकदा संभ्रम निर्माण झाला आहे. याआधी ७ सप्टेंबरला अंतिम यादी प्रसिद्ध होणार होती. परंतु आता ती ९ सप्टेंबरला प्रसिद्ध होईल, असे आयुक्त गणेश देशमुख यांनी काल पत्रकार परिषदेत सांगितले. प्रारुप मतदार यादीत झालेले महाघोळ अंतिम मतदारयादीत दूर होतील का? याची मतदारांसह इच्छुक उमेदवारांनाही उत्सुकता लागली आहे.

मनपा निवडणुकीचा कार्यक्रम बुधवारी राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केला. तत्पुर्वी ऑगस्ट महिन्यातच आयोगाने निवडणुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या मतदारयादीच्या प्रसिद्धीचा कार्यक्रम जाहीर केला होता. गेल्या १९ ऑगस्ट रोजी प्रारुप मतदारयादी प्रसिद्ध झाली. त्यावर २८ ऑगस्टपर्यंत आक्षेप मागवण्यात आले. मागच्या निवडणुकीच्या तुलनेत आक्षेपांच्या संख्येत साम्य नसले तरी यंदा नागरिकांकडून गंभीर प्रकारचे आक्षेप दाखल झाल्यामुळे शहरात काहीसे संभ्रमाचे वातावरण आहे.

यंदाच्या महापालिका निवडणुकीतील प्रत्येक मुहूर्त चुकत चालला आहे. प्रभागरचना तयार करण्यापासून ते आरक्षण आणि आता अंतिम मतदारयादी प्रसिद्धीची तारीख लांबली आहे. वेळोवेळी मिळत असलेल्या मुदतवाढीमुळे निवडणुकीच्या कामांबद्दल पुन्हा एकदा संभ्रमाचे वातावरण निर्माण होऊ लागले आहे. वारंवार नियोजित तारखा पुढे ढकलल्या जात असल्याने संभ्रमावस्था कायम राहत आहे, राज्य निवडणूक आयोगाच्या पथकाने नांदेडात येऊन मतदार पावतीच्या प्रशिक्षणानिमित्त सर्व यंत्रणेशी संवाद साधला. तरीही नियोजित कामांत काहीतरी त्रुटी किंवा सुधारणा करण्याचे काम शिल्लक राहून जात असल्याचे दिसून येत आहे.

## मुहूर्त लांबल्याने पुन्हा संभ्रम

### त्या अडीचशे मतदारांचे काय?

मनपा निवडणुकीत मतदानाचा हक्क मिळण्यासाठी नव्याने नोंदणी केलेल्या जवळपास अडीचशे मतदारांची नावे प्रारुप मतदार यादीत समाविष्ट नाहीत. महसूल व मनपा यंत्रणेत समन्वयाचा अभाव झाल्यामुळे ही परिस्थिती उद्भवल्याचे सांगितले जाते. अंतिम मतदारयादीत संबंधित मतदारांची नावे समाविष्ट व्हावीत, अशी मागणी त्यांच्यापैकी काही जणांनी मनपा आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

दै. देशोन्नती (6)

# अनामत रक्कम कमी असल्याने उमेदवारांची भाऊगर्दी होणार

**प्रतिनिधी / ७ सप्टेंबर**

**नांदेड :** महापालिका निवडणूकीच्या आखाड्यामध्ये उतरु इच्छीणाऱ्या सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवारांना ५ हजार रुपये तर राखीव प्रवर्ग आणि महिलांना केवळ २ हजार ५०० रुपये एवढी अल्पशा प्रमाणातील अनामत रक्कम भरावी लागणार आहे. त्यामुळे यावेळी महापालिकेच्या आखाड्यात निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची निश्चितच मोठी भाऊगर्दी होईल, असा अंदाज वर्तविला जात आहे.

महापालिकेच्या निवडणुकीसाठी गुडघ्याला बाशिंग बांधुन बसलेल्या इच्छूकांनी जनसंपर्कावर भर देण्यास प्रारंभ केला आहे. काँग्रेस आणि भारतीय जनता पार्टीने इच्छूक उमेदवारांकडून अर्ज देखील मागविले आहेत. अद्याप उमेदवाऱ्या निश्चित झालेल्या नसल्या तरी अनेकांनी पक्षाने उमेदवारी नाकारली तर अपक्ष म्हणून का होईना निवडणूक लढविण्याची तयारी सुरु केली आहे. यावेळी बहुसदस्यीय प्रभाग रचना असल्याने नामांकन दाखल करतांना उमेदवारांकडून किमान १० ते १५ हजार रुपये अनामत रक्कम घेतली जाईल, असे बोलले जात होते. परंतू राज्य निवडणूक आयोगाने सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवाराकडून ५ हजार रुपये तर राखीव प्रवर्ग आणि महिला उमेदवारांकडून केवळ २ हजार ५०० रुपये अनामत रक्कम घेण्याचा निर्णय घेतल्याने निवडणूक आखाड्यातील उमेदवारांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली दिसेल असा अंदाज राजकिय वर्तुळात बांधला जात आहे.